# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः07.05.2026** **वारः गुरुवार**

1. भारत-व्हिएतनाम दरम्यान विविध क्षेत्रांतील सामंजस्य करार संपन्न.
2. व्हिएतनामचे राष्ट्रपती आज मुंबई भेटीवर, संयुक्त व्यापार मंचाच्या कार्यक्रमात होणार सहभागी
3. बिहारमध्ये राज्य मंत्रिमंडळाच्या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित राहणार
4. आसाम, तामिळनाडूमध्येही नवीन सरकार स्थापनेच्या घडामोडींना वेग आणि
5. देशाच्या विविध भागात पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

**व्हिएतनाम पीएम-करार**

भारत आणि व्हिएतनाम दरम्यान काल विविध क्षेत्रांमध्ये सामजंस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. डिजीटल तंत्रज्ञान, दुर्मिळ खनिजे, वैद्यकीय उपकरणांचं नियमन, सार्वजनिक क्षेत्रातील लेखापरीक्षण डिजीटल देयक प्रणाली तसंच संस्कृती आणि पर्यटन या क्षेत्रांचा यामध्ये समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि व्हिएतनामचे राष्ट्रपती तो लाम यांच्यादरम्यान द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा झाली, त्यानंतर उभय नेत्यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर महिनाभराच्या कालावधीत लाम यांनी भारताला राजकीय भेट दिली यावरून भारत-व्हिएतनाम संबंधांना दिलेले प्राधान्य स्पष्ट होत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नमूद केलं. उभय देशांतील सामाईक वारसा जिवंत ठेवण्यासाठी व्हिएतनामच्या प्राचीन चंपा संस्कृतीतील माय सन आणि न्हाऊ ताऊ या मंदिरांचा जीर्णोद्धार करत असल्याचंही पंतप्रधानांनी सांगितलं. या संस्कृतीशी निगडीत हस्तलिखितांचं डिजीटलीकरण करणार असून भावी पिढ्यांसाठी हा वारसा जतन करणार असल्याचं ही त्यांनी नमूद केलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही काल संध्याकाळी व्हिएतनामच्या राष्ट्रपतींची भेट घेतली. भारत आणि व्हिएतनाम दरम्यान वाढत्या व्यापक धोरणात्मक भागीदारीमुळे द्विपक्षीय सहकार्याला गती मिळेलच मात्र प्रदेशातील शांतता आणि समृद्धी राखण्यातही योगदान मिळेल असं मूर्मू म्हणाल्या. दोन्ही देशांदरम्यानच्या सखोल मैत्रीला ऐतिहासिक, नागरी आणि सांस्कृतिक संबंधांची पार्श्वभूमी असल्याचं राष्ट्रपतींनी नमूद केलं.

**निर्मला सीतारामन-व्हिएतनाम**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल व्हिएतनमानचे समपदस्थ न्गो व्हान तुआन यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या बैठकीदरम्यान उभय देशांतील 10 वर्षांच्या सामरिक भागीदारीबाबत समाधान व्यक्त करून ती अधिक बळकट आणि वृद्धिंगत होत असल्याचंही नेत्यांनी नमूद केली. जागतिक अर्थव्यवस्था, बदलती भू-राजकीय आव्हानं या विषयांवर चर्चा करताना लवचिकता आणि स्थिरता वाढवण्याच्या मार्गांवर चर्चा झाली.

**मुंबई भेट**

व्हिएतनामचे राष्ट्रपती आज मुंबईला भेट देणार असून, राष्ट्रीय शेअर बाजाराच्या दिवसाची सुरुवात घंटा वाजवून करतील. त्यानंतर ते, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहेत तसंच भारत-व्हिएतनाम व्यापार मंचाच्या कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन बीजभाषण करतील. उभय देशांतील विविध भागधारकांना एकत्र आणत व्यापार आणि गुंतवणुकीच्या नव्या संधींचा शोध घेणे हे या मंचाचे उद्दीष्ट आहे. त्यानंतर लाम, राष्ट्रभवन इथं महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची भेट घेऊन सहभोजनाचा आस्वाद घेतील.

**बिहार**

बिहारमध्ये, मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाचा विस्तार आज होणार आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष संजय सरावगी यांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते आणि मंत्रिमंडळाचे सदस्य पाटणामधल्या गांधी मैदानावर होणाऱ्या शपथविधी समारंभास उपस्थित राहणार आहेत. या प्रसंगी एनडीएचे ज्येष्ठ नेतेही उपस्थित असतील.या शपथविधी सोहळ्याला आज दुपारी बाराच्या सुमारास सुरुवात होईल.

**आसाम**

आसाममध्ये विधानसभा निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, मुख्यमंत्री डॉकटर हिमंता बिस्वा सरमा यांनी काल गुवाहाटी इथल्या लोक भवनात राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांच्याकडं आपला राजीनामा सादर केला. या राजीनाम्यामुळं, निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर राज्यात नवीन सरकार स्थापन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत विद्यमान मंत्रिमंडळानं काळजीवाहू सरकार म्हणून कामकाज सुरू ठेवावं, अशी सूचना राज्यपालांनी केली असल्याचं सरमा यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं.

**तामिळनाडू टीव्हीके**

तामिळनाडूमध्ये टीव्हीके पक्षाचे प्रमुख सी. जोसेफ विजय यांनी सरकार स्थापनेचा दावा केला असून, त्यांनी राज्यपाल विश्वनाथ आर्लेकर यांनी भेट घेतली. राज्यात सरकार स्थापन करण्यासाठी अधिक पाठिंब्याची आवश्यकता असल्यानं टीव्हीके इतर पक्षांच्या संपर्का आहे. तर काँग्रेस पक्षानं टीव्हीकेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असून, काँग्रेसचे पाच आमदार आहेत. काँग्रसने नियोजित मुख्यमंत्री विजय यांची भेट घेऊन पाठिंब्याचे पत्र दिले आहे.

**बंगाल हत्या**

पश्चिम बंगालमध्ये भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांचे निकटवर्तीय चंद्रनाथ रथ यांची उत्तर चोवीस परगणा जिल्ह्यातल्या मध्यमग्राम इथं अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या घालून हत्या केली. दोहरिया इथं काल रात्री दुचाकींवरून आलेल्या हल्लेखोरांनी त्यांच्या गाडीवर बेछूट गोळीबार केला. चंद्रनाथ यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं, मात्र तिथे पोहोचताच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. त्यांचे चालक बुद्धदेव बेरा हे देखील या हल्ल्यात गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

**संरक्षण मंत्री**

जयपूर इथं आयोजित संयुक्त कमांडर परिषदेच्या दुसऱ्या सत्राला आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि संरक्षण प्रमुख जनरल अनिल चौहान उपस्थित राहणार आहेत. 'नवीन क्षेत्रांमधील लष्करी क्षमता' या संकल्पनेवर आधारित ही दोन दिवसीय परिषद 'ऑपरेशन सिंदूर'च्या पहिल्या वर्षपूर्तीच्या दिवशी होत असल्यानं याला विशेष महत्त्व आहे. ही परिषद सायबर, अवकाश यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमधल्या आव्हानांचं मूल्यांकन करण्यासाठी आणि भविष्यासाठी सैन्यदलाच्या क्षमता विकासाचा आराखडा तयार करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध करून देईल, असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. या परिषदेत मंत्रालयात विकसित केलेल्या भविष्यवेधी ॲप्लिकेशन्सचं प्रात्यक्षिक, भविष्यातील युद्ध संकल्पना आणि कार्यप्रणाली तसंच धोरणांशी संबंधित नवीन सिद्धांतांचं प्रकाशनही करण्यात येणार आहे.

**जयशंकर-सुरीनाम**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल पारामारिबो इथं सुरानामचे परराष्ट्र मंत्री मेलविन बोउवा यांची भेट घेऊन चर्चा केली आणि दोन्ही देशांदरम्यान संयुक्त आयोगाच्या 9व्या बैठकीत भारतीय आणि सुरीनामच्या शिष्टमंडळानं उभय देशांच्या संबंधांचा सर्वसमावेशक आढावा घेतला. या चर्चेत व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, संस्कृती आणि परस्पर लोकसंपर्क आदी विषयांचा आढावा घेण्यात आला. दोन्ही देशांदरम्यानचे संबंध सखोल आणि वैविध्यपूर्ण होण्यासाठी ही चर्चा उपयुक्त ठरेल असं प्रतिपादन जयशंकर यांनी नमूद केलं आहे. परस्पर घनिष्ट लोक संबंध हा उभय देशांच्या नात्याचा पाया असल्याचंही परराष्ट्रमंत्र्यांनी नमूद केलं आहे.

**कुंभ उद्योग संगम-नाशिक**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल नाशिक इथं झालेल्या 'कुंभ उद्योग संगम' आणि नाशिक गुंतवणूक परिषदेत 14 हजार कोटी रुपयांचे 314 सामंजस्य करार करण्यात आले. नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामीसिंहस्थ कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर दळणवळण सुविधा आणि पायाभूत विकास वेगाने होत आहे. या संधीचा फायदा घेत लघु आणि मोठ्या उद्योगांसाठी नाशिक आकर्षण केंद्र ठरत असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**अमेरिका-इराण**

आखाती प्रदेशातील संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीनं अमेरिका आणि इराण सामंजस्याच्या निकट पोहोचत असल्याचं चित्र आहे. प्रादेशिक सुत्रांनुसार एका मसुदा करारावर सक्रिय चर्चा सुरू आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एक पानी, 14 कलमी आराखड्यामुळे व्यापक कराराच्या दिशेने वाटाघाटींसाठी 30 दिवसांची मुदत मिळण्याची शक्यता आहे. या प्रस्तावाचा आढावा घेत असल्याचं इराणचं म्हटलं आहे तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी परिस्थिती नियंत्रणात असल्याचं म्हटलं आहे, मात्र चर्चा अयशस्वी झाल्यास लष्करी कारवाई पुन्हा सुरू होऊ शकते असा इशाराही दिला आहे. दरम्यान, इस्रायलच्या सूत्रांनुसार इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू वाटाघाटींच्या प्रगतीबाबत अमेरिकन अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करत आहेत. दरम्यान, इस्रायलने बेरूतच्या दक्षिण उपनगरात हिजबुल्लाच्या एका वरिष्ठ कमांडरला लक्ष्य करून केलेल्या हल्ल्याची पुष्टी केली आहे. युद्धविरामानंतर लेबनीज राजधानीतील हा पहिलाच हल्ला आहे.

**होर्मूझ-फ्रान्स**

होर्मूझची सामुद्रधुनी सुरक्षित कऱण्याच्या संभाव्य मोहिमेचा भाग म्हणून फ्रान्सने आपल्या विमानवाहू नौकांचा ताफा लाल समुद्रात तैनात केला आहे. फ्रान्सच्या लष्करानं प्रसिद्धीला दिलेल्या निवेदनात चार्ल्स डी गॉल विमानवाहू जहाजांसह इटली आणि डेन्मार्क यांची प्रत्येक एक युद्धनौका लाल समुद्राच्या दिशेने रवाना झाल्या आहेत. संघर्ष पूर्ण थांबल्यानंतर सुरक्षित वाहातुकीसाठी पायाभरणी कऱण्यासाठी फ्रान्स आणि ब्रिटन संयुक्तपणे एका प्रस्तावावर काम करत आहेत.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल रात्री झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघानं पंजाब किंग्जला 33 धावांनी पराभव केला. सनरायझर्स संघानं 236 धावा केल्या होत्या, पंजाब किंग्ज संघाला केवळ 202 धावाच करता आल्या.

**दिल्ली कॉमनवेल्थ**

दिल्लीत 27 जुलै ते 2 ऑगस्ट दरम्यान राष्ट्रकुल टेबल टेनिस स्पर्धा 2026 त्यागराज मैदानावर आयोजन होणार आहे. स्पर्धेत 35 हून अधिक देशांतील खेळाडू सहभागी होण्याची अपेक्षा आहे. दिल्ली सरकार आणि 'टेबल टेनिस फेडरेशन ऑफ इंडिया' यांच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा तसंच आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड सह अंदमान निकोबार बेटांवर आज मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट तसंच सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. त्याचबरोबर तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, केरळम सह उर्वरीत देशभरातही पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.